महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

epaper.shauryaMarathi.com | वर्ष : - १ ले | अंक :- ८८ | शनिवार दि.१ फेब्रुवारी २०२५ पान :- ४ किंमत ५ रु. | जळगाव

## सरकारने विकसित भारताच्या योजनेला नवीन ऊर्जा दिली-राष्ट्रपती मुर्मू

नवी दिल्ली- राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू शुक्रवारी (दि.३१) संसदेच्या दोन्ही सभागृहांना (राज्यसभा आणि लोकसभा) संबोधित करतील. यासोबतच अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होईल. केंद्रीय अर्थसंकल्प १ फेब्रुवारी रोजी सादर केला जाईल. राष्ट्रपती मुर्मू सकाळी ११ वाजता लोकसभा आणि राज्यसभेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करतील. अर्थसंकल्पीय अधिवेशन ३१ जानेवारी ते ४ एप्रिल या कालावधीत दोन टप्प्यात होणार आहे. सत्राचा पहिला भाग १३ फेब्रुवारी रोजी संपेल आणि दुसरा टप्पा १० मार्चपासून सुरू होईल.

दिल्ली विधानसभा निवडणुकीच्या गोंधळात संसदेचे अर्थसंकल्पीय अधिवेशन शुक्रवारपासून सुरू होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन आर्थिक सर्वेक्षण सादर करतील. या सर्वेक्षणात देशाच्या अर्थव्यवस्थेच्या आरोग्याचा लेखाजोखा मांडला जाईल. यामध्ये कृषी, उद्योग आणि सेवा क्षेत्रातील प्रमुख ट्रेंड्स तसेच आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी आणि आव्हानांना तोंड देण्यासाठी धोरणात्मक सूचनांचा समावेश असेल. अर्थमंत्री सीतारमण शनिवारी मोदी सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळातील दुसरे पूर्ण अर्थसंकल्प आणि सलग आठवे बजेट सादर करतील.

संसदेच्या संयुक्त बैठकीला संबोधित करताना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, एमएसएमई आणि ई-कॉमर्स निर्यात केंद्रांसाठी क्रेडिट हमी योजना देशातील सर्व क्षेत्रांमध्ये व्यवसायाला प्रोत्साहन देत आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू म्हणाल्या, 'जगातील अनेक विकसित देशही भारताच्या यूपीआय तंत्रज्ञानाच्या यशाने प्रभावित झाले आहेत. आज भारतात ५०% पेक्षा जास्त रिअल टाइम डिजिटल व्यवहार होत आहेत. माझ्या सरकारने सामाजिक न्याय आणि समानतेसाठी डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केला आहे. माझे सरकार सायबर सुरक्षेत कार्यक्षमता सुनिश्चित करण्यासाठी सतत काम करत आहे. डिजिटल फसवणूक, सायबर गुन्हे आणि डीपफेक हे सामाजिक, आर्थिक आणि राष्ट्रीय सुरक्षेसाठी गंभीर आव्हाने आहेत. उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे कनेक्टिव्हिटी प्रकल्प पूर्ण झाला आहे आणि आता देश काश्मीर ते



कन्याकुमारी पर्यंत रेल्वे मार्गाने जोडला जाईल.

'देशातील १६३ विद्यापीठांचा आशिया क्रमवारीत समावेश करण्यात आला आहे. नालंदा विद्यापीठाच्या माध्यमातून भारताचे जुने वैभव परत आणले गेले आहे. तो दिवस दूर नाही जेव्हा भारतात बांधलेल्या गगनयानमधून एक भारतीय अंतराळात जाईल. काही दिवसांपूर्वी इस्रोने स्पेस डॉकिंगचा पराक्रम केला आणि अलीकडेच इस्रोने उपग्रह प्रक्षेपणातही एक मोठी कामगिरी केली. ग्वाल्हेरमध्ये दिव्यांगांसाठी एक विशेष केंद्र उघडण्यात आले आहे. अलिकडेच, भारताने बुद्धिबळातही मोठी कामगिरी केली आहे. राष्ट्रपती म्हणाले, 'आमचे ध्येय भारताला नवोन्मेषाचे जागतिक पॉवरहाऊस बनवणे आहे. संशोधनाला चालना देण्यासाठी १० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

राष्ट्रपती सर्वांना संबोधित करताना म्हणाल्या की, आज देशात मोठे निर्णय वेगाने अंमलात आणले जात आहेत. या निर्णयांचा देशातील गरीब, महिला आणि वंचितांना फायदा झाला. माझ्या सरकारने तीन कोटी कुटुंबांना घरे देण्यासाठी पंतप्रधान आवास योजनेचा विस्तार करण्याचा निर्णय घेतला आहे. पंतप्रधान मालकी योजनेअंतर्गत आतापर्यंत दोन कोटींहून अधिक मालकी कार्ड जारी करण्यात आले आहेत. पंतप्रधान किसान सन्मान निधी आणि आयुष्मान योजनेअंतर्गत कोट्यवधी लोकांना मदत दिली जात आहे.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी संसदेच्या संयुक्त अधिवेशनाला संबोधित करण्यास सुरुवात केली आहे. राष्ट्रपतींनी महाकुंभातील मौनी अमावस्येला झालेल्या अपघाताबद्दल दुःख व्यक्त केले आणि मृतांना श्रद्धांजली वाहिली. माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांच्या निधनाबद्दल राष्ट्रपतींनी शोक व्यक्त केला.

## संसदेच्या अधिवेशनात अनेक ऐतिहासिक विधेयकांवर चर्चा होणार - पंतप्रधान नरेंद्र मोदी

नवी दिल्ली - अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित केले. संसदेच्या या अधिवेशनात अनेक ऐतिहासिक विधेयकांवर चर्चा होणार असून व्यापक चर्चेतून राष्ट्राची ताकद वाढवणारे कायदे बनतील. त्याशिवाय यंदाच्या अधिवेशनात महिलांसाठी असे निर्णय घेण्यात येतील ज्यातून त्यांचा सन्मानपूर्वक जीवन मिळेल असं पंतप्रधान मोदींनी म्हटलं.

पंतप्रधान मोदींनी त्यांच्या निवेदनापूर्वी लक्ष्मी मातेचं स्मरण केले. ते म्हणाले की, खूप जुनी परंपरा आहे. माता लक्ष्मी कल्याणासह समृद्धी विवेकही प्रदान करते. देशातील प्रत्येक गरीब आणि मध्यमवर्गीयांवर माता लक्ष्मीची विशेष कृपा



बनून राहू दे. केंद्र सरकार आणि राज्य सरकार मिळून कामगिरी करत आहे. माझ्या तिसऱ्या कार्यकाळातील हा पहिला संपूर्ण बजेट असेल. २०४७ साली जेव्हा स्वातंत्र्याला १०० वर्ष पूर्ण होतील तोपर्यंत विकसित भारताचं जो संकल्प देशाने घेतला आहे, त्याला बजेट अधिवेशनातून नवा विश्वास आणि ऊर्जा मिळेल असं त्यांनी म्हटलं.

त्याशिवाय २०१४ पासून आतापर्यंत कदाचित हे पहिलेच बजेट असेल ज्याच्या १-२ दिवसाआधी कोणतीही 'विदेशी ठिणगी' पेटली नाही. परदेशातून काही आले नाही. प्रत्येक अधिवेशनापूर्वी काही लोक तयार बसलेले असतात त्यांना इथं हवा देणाऱ्यांची कमी नाही असं सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विरोधकांना टोला लगावला आहे. २०१४ पासून देशात मोदी सरकार आल्यापासून एक ट्रेंड सुरू असतो. अधिवेशनाच्या पूर्वी परदेशातून एखादा रिपोर्ट येतो, त्यावरून विरोधक सरकारची कोंडी करण्याचा प्रयत्न करतात, हिंडेनबर्ग रिपोर्ट, गुजरात दंगलीवर डॉक्युमेंटरी, पेगासस रिपोर्ट यासारखे अनेक मुद्दे अधिवेशनाच्या काही दिवस आधी चर्चेत येतात त्यावरून मोदींनी हे भाष्य केले आहे.

## महाकुंभामध्ये चेंगराचेंगरीत लहान मुलासह ७ जणांचा मृत्यू

नवी दिल्ली- संगम नाका येथे झालेल्या चेंगराचेंगरीनंतर काही तासांत झालेल्या दुसऱ्या चेंगराचेंगरीत एका लहान मुलासह सात जणांचा मृत्यू झाला.

कल्पवासी पोलिस स्टेशनचे सर्कल ऑफिसर रुद्र कुमार सिंग यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, संगम नाक्यापासून ३ किमी अंतरावर असलेल्या घाटालगत झुसी येथे ही चेंगराचेंगरी झाली.

जास्त गर्दीच्या दबावामुळे झुसी येथे सात जण घटनास्थळी मृत आढळले, असे अधिकाऱ्याने सांगितले.



चेंगराचेंगरीनंतर, उत्तर प्रदेश सरकारने सुरक्षा उपायांचा भाग म्हणून व्हीव्हीआयपी पास आणि वाहनांमध्ये प्रवेश रद्द करून कारवाई केली. दरम्यान, विरोधकांनी प्रशासनावर या संघटनेसाठी टीका केली आणि महाकुंभ चेंगराचेंगरीचा संसदेच्या अधिवेशनातही उल्लेख करण्यात आला.

## हा खेळ चालणार नाही, डोनाल्ड ट्रम्प यांचा भारतासह ब्रिक्स राष्ट्रांना इशारा

नवी दिल्ली- डोनाल्ड ट्रम्प यांनी ब्रिक्स राष्ट्रांना इशारा देणारी पोस्ट समाजमाध्यमांवर शेअर केली आहे.

अमेरिकेचे नवनिर्वाचित अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे सध्या त्यांच्या नवनव्या निर्णयांमुळे जगभर चर्चेत आहेत.

अशातच आता त्यांनी ब्रिक्स राष्ट्रांबाबत नाराजी व्यक्त केली आहे.

ब्रिक्स राष्ट्रे (ब्राझील, रशिया, भारत, चीन व दक्षिण आफ्रिका) त्यांचं नवं चलन सुरू करण्याच्या प्रयत्नात असल्याच्या बातम्या अलीकडच्या काही महिन्यांपासून आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चेत आहेत.

मात्र, ट्रम्प यांनी यावरून ब्रिक्स देशांना थेट धमकी दिली



आहे. डोनाल्ड ट्रम्प म्हणाले, ब्रिक्स देशांनी एक गोष्ट ध्यानात घ्यावी की ते डॉलरला पर्याय निर्माण करू शकत नाहीत. जर तसा प्रयत्न होत असल्यास अमेरिका ब्रिक्स राष्ट्रांवर १०० टक्के लावू शकते.

डोनाल्ड ट्रम्प यांनी समाजमाध्यमांवर यासंबंधीची एक पोस्ट लिहिली आहे. यामध्ये त्यांनी म्हटलं आहे की ब्रिक्स देश अमेरिकन डॉलरच्या वर्चस्वाला आव्हान देऊ पाहतायत आणि गेल्या काही महिन्यांपासून आम्ही केवळ बघ्याच्या भूमिकेत आहोत. मात्र, आता तसं चालणार नाही. अमेरिकेच्या वर्चस्वाला आव्हान देण्यासाठी ब्रिक्सने नवीन चलन तयार करू नये.

तसेच ब्रिक्सच्या प्रभावाखाली असलेल्या राष्ट्रांना माझं सांगणं आहे की त्यांनी या ब्रिक्स चलनाचं समर्थन करू नये.

ही अट मान्य न करणाऱ्या ब्रिक्स देशांवर १०० टक्के कर लागू केला जाईल. जे देश ही गोष्ट मान्य करणार नाहीत त्यांच्यासाठी अमेरिकन मार्केटचे (बाजार) दरवाजे बंद होतील. त्यांनी नवं मार्केट शोधावं. मार्केटसाठी तुमच्यासारखेच इतर देश शोधा. ब्रिक्स देश आंतरराष्ट्रीय बाजारात अमेरिकन डॉलरऐवजी इतर कोणत्याही चलनाला प्राधान्य देतील असं मला वाटत नाही.

### ट्रम्प यांची ब्रिक्स देशांना थेट धमकी

**डोनाल्ड ट्रम्प यांनी यापूर्वी देखील ब्रिक्स देशांना इशारा दिला होता. ते म्हणाले होते ब्रिक्स देशांनी अमेरिकेविरोधात धोरणं आणली तर त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील. या देशांनी अमेरिकेच्या हिताविरोधात काही गोष्टी करण्याचा प्रयत्न केला आहे. यापुढेही हे देश असेच वागत राहिले तर त्यांच्याबरोबर जे काय घडतंय पाहा. ते देश आनंदी राहू शकणार नाहीत, अश इशारा ट्रम्प यांनी दिला. अमेरिकेच्या अध्यक्षपदाची शपथ घेतल्यानंतर ट्रम्प सर्वात आधी त्यांच्या ओव्हल कार्यालयात दाखल झाले. तिथे त्यांनी अनेक कार्यकारी आदेशांवर स्वाक्षरी केली. यावेळी त्यांनी ब्रिक्स देशांना धमकावलं. ते म्हणाले, ब्रिक्स देशांनी अमेरिकेविरोधात धोरणं आणण्याचा नुसता प्रयत्न केला तरी त्यांना त्याचे परिणाम भोगावे लागतील.**

## अन्न व औषध प्रशासनातर्फे अन्न सुरक्षा आणि स्वच्छता या विषयावर १ दिवसीय कार्यशाळा व्यावसायिकांना अन्न परवाण्यासाठी अर्ज करण्याचे सहायक आयुक्तांचे आवाहन

जळगाव ( जिमाका )- अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, जळगाव कार्यालयामार्फत ३० जानेवारी रोजी सहायक आयुक्त, समाज कल्याण, जळगाव, जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, जळगाव व सहायक आयुक्, समाज कल्याण, जळगाव विभागाच्या अधिपत्या खालील कार्यरत असणाऱ्या सर्व अनुदानित वसतिगृहे तसेच निवासी शाळा यामध्ये देण्यात येणा-या भोजन आहार यांच्या गुणवत्ता नियंत्रण करण्याकरिता त्या सर्व वसतिगृहे व शाळा यांना अन्न व औषध विभाग महाराष्ट्र शासन अन्न सुरक्षा आणि स्वच्छता या विषयावर १ दिवसीय कार्यशाळा ए.टी. आर. लॅबोरेटरी येथे आयोजित करण्यात आली होती.

या कार्यशाळेअंतर्गत सर्व प्रशिक्षणार्थी यांना प्रशिक्षण कीट भारत सरकार मार्फत प्रमाणपत्र देण्यात आले.

यावेळी सं.कृ. सं.कृ., सहायक आयुक्त (अन्न) यांनी सर्व उपस्थितांना मार्गदर्शन करताना विनापरवाना अन्न व्यवसाय करणे कायदयानुसार गुन्हा असून १० लाखापर्यंत दंडाचे कायदयात प्रावधान आहे, विनापरवाना अन्न व्यवसाय करणा-यांविरुद्ध कायदेशीर कारवाई टाळण्यासाठी सर्व




अन्न व्यावसायिकांनी परवाना/नोंदणी करावी. तसेच ज्या अन्न व्यावसायिकांकडे परवाना आहे, त्यांनी मुदतीच्या पूर्वी ऑनलाईन नूतनीकरण करुन घ्यावे. अन्यथा रुपये ६०००/- इतका दंड असून मुदत संपल्यानंतर परवाना रद्द होत असून व्यवसाय विना परवाना गृहित धरुन त्यांच्या विरुदध कायदेशीर दंडात्मक कारवाई करण्यात येते असे सांगितले.

तसेच अन्न परवाना व नोंदणीसाठी अन्न सुरक्षा व मानके प्राधिकरण यांच्या https://foscos.fssai.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन सुविधा उपलब्ध आहे. ज्यांची वार्षिक उलाढाल १२ लाखाच्या आत असेल अशा दुकानांनी अन्न नोंदणी करणे व ज्यांची वार्षिक उलाढाल १२ लाख किंवा त्यापेक्षा अधिक असेल अशा अन्न व्यावसायिकांनी अन्न परवानासाठी अर्ज करावा. असे आवाहन या कार्यशाळेत केले. या कार्यक्रमास व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, जळगाव कार्यालयाचे सहायक आयुक्त (अन्न) सं.कृ. कांबळे, अन्न सुरक्षा श.म. पवार, स.न.बारी, वरिष्ठ लिपीक हे उपस्थित होते.

## एसटी महामंडळाचा आवडेल तेथे कोठेही प्रवास महागला आजपासून सुधारीत दर लागू

मुंबई- महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नुकतीच एसटी बस दरात १५ टक्क्यांची वाढ केली आहे. त्यामुळे ग्रामीण महाराष्ट्राची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या लालपरीचा प्रवास महागला आहे. सर्वसामान्यांच्या खिशाला कात्री लागली असतानाच आता एसटी महामंडळाच्या आवडेल तेथे कोठेही प्रवास या सवलत योजनेच्या दरात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या वतीने आवडेल त्या ठिकाणी कोठेही प्रवास करण्यासाठी आवडेल तेथे कोठेही प्रवास ही सवलत योजना प्रवाशांसाठी चडठढउ मार्फत राबविली जाते. या योजनेअंतर्गत



७ दिवस व ४ दिवस याप्रमाणे बसेच्या प्रकारानुसार तसेच आंतरराज्यांसह प्रवास सुविधा उपलब्ध करुन दिली जाते. या योजने अंतर्गत येणाऱ्या बससेवांचे प्रतिटप्पा दरात वाढ करण्यात आली आहे. नवीन टप्पा दरपत्रकाप्रमाणे देण्यात येणाऱ्या पासचे सुधारीत दर, अटी व शर्ती लागू करण्यास सक्षम प्राधिकारी यांनी मंजुरी दिली आहे. हे दर १ फेब्रुवारी २०२५ पासून अंमलात येणार आहे.

आवडेल तेथे कोठेही प्रवास पास योजनेअंतर्गत ४ दिवस आणि ७ दिवसांचे पास देण्यात येतात. या पासचे सुधारित दर खालीलप्रमाणे आहेत.

सेवेचा प्रकार ४ दिवसांच्या पासचे दर ७ दिवसांच्या पासचे दरसाधी, जलद, रात्रसेवा प्रौढ- १८१४, मुले- ९१० प्रौढ- ३१७१, मुले- १५८८

**आंतरराज्य, शहरी, मिडीबस**

शिवशाही (आसनी) प्रौढ- २५३३, मुले-१२६९ प्रौढ- ४४२९, मुले-२२१७

**आंतरराज्यसह**

१२ मीटर ई-बस (ई-शिवाई) प्रौढ- २८६१, मुले- १४३३ प्रौढ-५००३, मुले- २५०४

## अर्थव्यवस्था मजबूत राहिल, महागाई झाली कमी-अर्थमंत्री निर्मला सीतारामन

मुंबई- केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमन या देशाचा अर्थसंकल्प उद्या (१ फेब्रुवारी) मांडणार आहेत. या अर्थसंकल्पात शेतकरी, तरूण आणि महिलांसाठी अनेक घोषणा केल्या जाऊ शकतात. आजपासून अर्थसंकल्पीय अधिवेशनाला सुरुवात झाली असून, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी दोन्ही सभागृहांना संबोधित केले.

अर्थमंत्री निर्मला सीतारमन यांनी अर्थसंकल्पापूर्वी आर्थिक सर्वेक्षण २०२४-२५ देखील सादर केले. सर्वेक्षणानुसार, पुढील आर्थिक वर्षासाठी भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर ६.३ टक्के ते ६.८ टक्क्यांदरम्यान राहण्याचा अंदाज आहे. सर्वेक्षणानुसार भारताला २०४७ पर्यंत विकसित देश बनायचे



असल्यास वृद्धी दर ८ टक्के असणे गरजेचे आहे.

आर्थिक सर्वेक्षणानुसार, किरकोळ महागाईमध्ये आर्थिक वर्ष २०२४ मधील ५.४ टक्क्यांवरून एप्रिल-डिसेंबर २०२४ मध्ये ४.९ टक्क्यांपर्यंत घसरण झाली आहे.

त्याच वेळी, रोजगारातही सुधारणा दिसून आली. २०१७-१८ (जुलै-जून) मध्ये बेरोजगारीचा दर ६ टक्क्यांवरून २०२३-२४ (जुलै-जून) मध्ये ३.२ टक्क्यांपर्यंत घसरला आहे. या आर्थिक वर्षाच्या चौथ्या तिमाहीमध्ये महागाई आणखी कमी होईल असा अंदाज आहे.

याशिवाय, जीएसटी जीएसटी संकलनात ११ टक्क्यांनी वाढ होऊन, संकलन १०.६२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे. भारताचा परकीय चलन साठा जानेवारी २०४ अखेर ६१६.७ अब्ज अमेरिकन डॉलर्सवरून सप्टेंबर २०२४ मध्ये ७०४.९ अब्ज अमेरिकन डॉलर्सपर्यंत वाढला. ३ जानेवारी २०२५ रोजी ६३४.६ अब्ज अमेरिकन डॉलर्स एवढा होता.

## मराठीतील अभिजात साहित्य पुढच्या पिढीकडे नेण्याकरिता कृत्रिम बुद्धीमत्तेचा वापर करावा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांचा 'साहित्य भूषण' पुरस्कार देऊन सन्मान

पुणे : तिसऱ्या विश्व मराठी संमेलनाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, ज्येष्ठ साहित्यिक पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या उपस्थितीत आणि देशातून, राज्यातून, परदेशातून आलेल्या साहित्यिक, मराठीप्रेमींच्या प्रचंड उत्साहात उद्घाटन झाले.

आजच्या कृत्रिम बुद्धीमत्तेच्या युगात मराठीतील




आपले अभिजात साहित्य पुढच्या पिढीकरिता कसे नेता येईल यादृष्टीने चॅट-जीपीटी सारखे एखादे 'स्मॉल लँग्वेज मॉडेल' तयार करण्यासाठी मराठी भाषा विभागाने पुढाकार घ्यावा, अशी सूचना मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.

फर्ग्यूसन महाविद्यालय येथे संमेलनाच्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले मुख्यमंचात झालेल्या या कार्यक्रमास खासदार श्रीरंग बारणे, आमदार भीमराव तापकीर, सिद्धार्थ शिरोळे, बापूसाहेब पठारे, मराठी भाषा विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा पाटणकर- म्हैसकर, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे अध्यक्ष डॉ. रवींद्र शोभणे, भाषा सल्लागार समितीचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या नियोजित अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर, अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाच्या अध्यक्षा उषा तांबे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी, मराठी भाषा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. अविनाश आवलगावकर आदी उपस्थित होते.

इंग्लंड मधील मराठी मंडळाला त्या ठिकाणी जागेच्या संदर्भात आवश्यक ती मदत येत्या पंधरा दिवसांमध्ये निश्चितच देण्यात येईल. तसेच दिल्लीतली मराठी शाळा देखील अव्याहत चालल्या पाहिजेत याकरितादेखील महाराष्ट्र शासन आवश्यक ती मदत करेल, अशी ग्वाही देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिली.

## संपादकीय

### महाकुंभातील चेंगराचेंगरी

तब्बल १४४ वर्षानंतर प्रयागराज येथील महाकुंभ मेळाव्याला अनन्यसाधारण असे धार्मिक महत्त्व असल्याने २९ जानेवारी २०२५ ला मौनी अमावस्या निमित्त प्रयागराज येथील त्रिवेणी संगमावर स्नान केल्याने सर्व पापे दूर होतात या श्रद्धेमुळे कोट्यावधी भाविक प्रयाग्रज येथे २८ जानेवारीला दाखल झाले होते. पहाटे तीन वाजेच्या सुमारास त्रिवेणी संगमावर स्नान करण्यासाठी अनेक भाविक संगमावरील घाटावर झोपले होते. दिनांक २८ आणि २९ जानेवारीला सात कोटी भाविक देशातून प्रयागराज संगमावर येणार, अशा बातम्या प्रसारित झाल्या होत्या. प्रत्यक्षात किती कोटी भाविक संगमावर आले त्यांचा अधिकृत आकडा दिला गेला नसला तरी २८ जानेवारीच्या मध्यरात्री संगमावरील घाटात स्नान करण्यासाठी भाविकांचा लोंढा वाढला आणि संगमावर स्नान करण्यासाठी भाविकांची चेंगराचेंगरी झाली. घाटावर आधीच जाऊन झोपलेल्या भाविकांच्या अंगावर इतर भाविक जाऊन धडकले. त्यात झालेल्या चेंगराचेंगरीत अनेकांचे प्राण गेले आणि अनेक लोक जखमी झाले.

चेंगराचेंगरीमुळे संगमावर टाहो फुटला. वाचवा.. वाचवा.. म्हणणाऱ्या भाविकांना वाचविण्यासाठी कुणीही मदतीला धावून गेले नाही. मृदांचा आकडा अंदाजे ३० आणि ६० जखमी असल्याचे सांगण्यात येत असले तरी अधिकृत आकडा कितीतरी मोठा असल्याचे बोलले जात आहे. अनेकांची लहान मुले गायब झाली असून ती सापडत नसल्याने त्यांच्या कुटुंबियांचा आक्रोश मन हेलावणारा आहे. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाविक प्रयागराजला येणार असल्याने रेल्वे स्टेशनवर तसेच बस स्थानकावर उतरलेल्या भाविकांच्या संगमावर जाण्यासाठी बॅरिगेट लावून रस्ते पॅक केले होते. रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकापासून १५ किलोमीटर पर्यंत पायी चालत भाविक जातात. त्यानंतर मिळेल त्या खाजगी वाहनाने संगमा जवळ पोहोचतात.

त्यातच व्हीआयपीसाठी आणि सर्वसामान्य भाविकांसाठी दोन वेगवेगळे मार्ग केल्याने व्हीआयपी भाविकांचे स्नान सुखरूप पद्धतीने झाले. तथापि सर्वसामान्य भाविकांना मात्र गर्दीच्या महापुराचा त्रास सहन करावा लागला. महाकुंभाच्या स्नानासाठी आलेल्या भाविकांच्या सुरक्षेसाठी ५० हजार पोलीस तैनात करण्यात आल्याचे उत्तर प्रदेश सरकारचे सांगणे असले, तरी कोट्यावधी भाविकांची सुरक्षा करण्यासाठी पोलीस कमी पडले यात शंका नाही. अनेक भाविक आपल्या घरातून चार ते पाच दिवस आधीपासून निघाल्यामुळे सोबत बरेच सामान घेऊन आले होते. त्या सामानासह प्रवास हा त्यांच्यासाठी जिकरीचा ठरला. प्रयागराज वरून स्नान केलेल्या भाविकांनी अयोध्याकडे जाऊन रामाचे दर्शन घेण्यासाठी एकच गर्दी केल्यामुळे अयोध्येतही भाविकांची गर्दी वाढली. अखेर पुढील पंधरा दिवस नवीन भाविकांना अयोध्येत येऊ नये असे जाहीर आवाहन उत्तर प्रदेश सरकारने केले आहे.

एकंदरीत उत्तर प्रदेश सरकारने प्रयागराजच्या महाकुंभ मेळाव्याच्या नियोजनावर तसेच विकासावर ६ हजार ९०० कोटी रुपये खर्च करून सुविधा उपलब्ध करून दिली असल्याचे सांगण्यात येत असून या महा कुंभमेळ्यातून उत्तर प्रदेश सरकारला २ लाख कोटी रुपये महसूल मिळणार असल्याचे बोलले जात आहे. त्यातून उत्तर प्रदेशचे अर्थकारणच बदलून जाईल ही अपेक्षा योगी आदित्यनाथ सरकारने व्यक्त केली होती. एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाविक येणार, असे महाकुंभ मेळावा आयोजकांना माहिती होते. तर त्या दृष्टीने भाविकांसाठी सुविधा उपलब्ध करून द्यायला हवी होती. यामध्ये खाजगी कंपन्यांनी सुद्धा कोट्यावधी रुपयांची कमाई केली. तथापि एवढे लोक होऊन सुद्धा चेंगराचेंगरीचे जे गालबोट लागले त्याची जबाबदारी मात्र उत्तर प्रदेश सरकार किंवा केंद्रातील पंतप्रधान मोदी सरकार घेत नाही, याचे कारण काय?

प्रत्येक बारा वर्षाला प्रयागराजला कुंभमेळावा होतो आणि छोट्या मोठ्या घटना घडत असतात. हे माहिती असताना एवढ्या मोठ्या प्रमाणावर भाविक आल्यानंतर दुर्घटना होणार नाही, याची दक्षता घेणे उत्तर प्रदेश सरकारने घ्यायला हवी होती. ती त्यांनी घेतली नाही, हे येथे खेदाने नमूद करावेसे वाटते. एक तर मृतांचा व जखमींचा अधिकृत आकडा अद्यापही उत्तर प्रदेश सरकारकडून जाहीर केला गेलेला नाही. उलट अफवा पसरवू नका असे, आवाहन करून भाविकांची दिशाभूल केली जाते. ही बाब उत्तर प्रदेश सरकारला शोभणारी नाही. विशेष म्हणजे कालही सेक्टर २२ मध्ये कापडी तंबूंना आग लागून भीषण आगीचे थैमान प्रयाग्रज येथे पाहायला मिळाले. सुदैवाने यात कोणत्याही प्रकारची जीवित हानी झाली नसली तरी भाविकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. १५ ते २० पेक्षा जास्त कापडी तंबू जळून खाक झाल्याने प्रशासनाच्या नियोजनावर पुन्हा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

चेंगराचेंगरीच्या वृत्तानंतर भाविकांच्या नातेवाईकांचे फोनवर फोन चालू आहेत. परंतु त्यांना कसलीही माहिती उपलब्ध होत नसल्याने ते सैरभैर झाले आहेत. चेंगराचेंगरीमध्ये सर्वसामान्य भाविकांचा बळी गेला. तेच भाविक जखमी झाले. व्हीआयपी भाविकांमध्ये सर्वजण सुखरूप स्नान करून परतले. परंतु व्हीआयपी भाविकांपेक्षा सर्वसामान्य भाविकांचीच खरीभक्ती असते. व्हीआयपी भाविकांमध्ये अनिल अंबानी सारखे उद्योगपती कोट्यावधीचे बँक कर्ज बुडवून पापक्षालनासाठी प्रयागराज महाकुंभ स्नान करतात. यावरून टीका होते आहे. बिचारे गरीब भाविकांचे वाली कोण आहेत? हा प्रश्न मात्र अद्याप अनुउत्तरीत आहे!

## अवैध कॅफेवर कारवाई केली; आता गुटखा, नकली दारु, सट्टा व वाळू माफिया विरोधात धुळे शहराचे आमदार केव्हा सापळा रचणार? शिवसेना उबाठाचा सवाल

धुळे(प्रतिनिधी)- धुळे शहरात आज अवैध कॅफे सेंटरवर आमदारांनी व पोलीस प्रशासनाने धाड टाकून कारवाई केली या कारवाईचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले असून पाच दिवसांपूर्वी अशीच कारवाई झाल्यानंतर हे कॅफे चालू होतातच कसे?असा प्रश्न देखील शिवसेना पक्षाने विचारला असुन आज झालेल्या कारवाईचे स्वागत केले.

आमदारांना या अवैध रीतीने चालणाऱ्या धंद्याची माहीती मिळते, पण संबंधित बिट वर ड्युटी करणारे पोलिस यांना याबाबतीत माहिती नसणे म्हणजे पोलिस अद्याप पर्यंत डोळे झाक करीत होते का? असा प्रश्न धुळेकर उपस्थित करीत आहेत.

धुळे शहरात अवैध मटका, सट्टा, गावठी कट्टे, चरस, गांजा, अफु, गुटखा,वाळू तस्करी, गुंडगिरी, खुन, हाफ मर्डर, घरफोडी, चेंन स्नॅपिंग, मोटर सायकल चोरी, अवैध धंद्यांच्या प्रकरणात वाढ झालेली असुन त्यावर देखील कारवाई व्हावी अशी रास्त अपेक्षा जिल्हा पोलीस प्रमुख यांच्याकडे शिवसेना उबाठाने व्यक्त केली आहे.

जिल्हा पोलिस अधीक्षक यांनी आज केलेल्या कारवाईचे शिवसेना उबाठा वतीने अभिनंदन करण्यात आले असुन, आज शहराच्या आमदारांनी या कामासाठी पुढाकार घेतला असून येणाऱ्या काळात सर्व अवैध धंद्यांच्या विरोधात त्यांनी पुढाकार घ्यावा.धुळे शहरात अवैध रीतीने गुटखा कंटेनर उतरवीले जातात, दररोज हजारो आयव्हा मधुन हजारो ब्रास वाळू उपसा करून रॉयलटी न भरता त्याचे वाहतूक सुरू असते, शिवाय अंमली पदार्थ चरस, गांजा, भांग विक्री असो की गावठी कट्टे, शहरातील लॉजेस वर चालणारे अनैतिक प्रकार हे थांबायलाच हवेत यासाठी आता



आमदार कधी सापळा लावतात याची प्रतिक्षा धुळेकरांसह शिवसेनेला असुन, आमदारांनी अवैध धंदे विरोधात मैदानात उतरावे शिवसेना पक्ष विरोध बाजुला ठेवून त्यांच्या खांद्याला खांदा लावून काम करेल.

आमदरांनी चांगले काम केले तर त्यांना विरोध न करता त्यांचे जाहीर कौतुकच करू पण वाईट कामांविरोधात आवाज हा उठवुच असे पत्रक शिवसेना उबाठा पक्षाच्या वतीने शिवसेना उपनेते शुभांगी पाटील, मा.आ.प्रा.शरद पाटील, जिल्हाप्रमुख अतुल सोनवणे, माजी महापौर भगवान करनकाळ, नरेंद्र परदेशी, विजय वाघ, प्रशांत भदाणे, महानगर प्रमुख धीरज पाटील, भरत मोरे, संदीप सूर्यवंशी, ललित माळी, गुलाब माळी, नितीन शिरसाठ, विनोद जगताप, निंबा नाना मराठे, प्रफुल्ल पाटील, डॉ.अनिल पाटील, मनोज वाल्हे, डॉ. सोमनाथ चौधरी,जवाहर पाटील, संजय पाटील, कपिल लिंगायत, शिवाजी शिरसाळे, कैलास मराठे, आण्णा फुलपागारे, महादू गवळी, विकास शिंगाडे, दिनेश पाटील, सुनील चौधरी, संदीप चौधरी, आबा भडागे, मनोज शिंदे, हिमांशू परदेशी, पंकज भारस्कर, रामदास कानकाटे, कालु गावडे,विष्णू जावडेकर, डॉ.संजय पिंगळे, महिला आघाडीच्या संगीता जोशी, अरुणा मोरे, पिनु सूर्यवंशी,सागर निकम, अजय चौधरी, चिलु आवळकंठे, अविनाश लोकरे, प्रकाश महानर, अजय चौधरी, अमोल ठाकूर, अनिल शिरसाट, शुभम रणधीर, वैभव पाटील, केतन भामरे, सचिन रुणवाल आदींच्या वतीने करण्यात आले आहे.

## सोनगीर महाविद्यालयात आज वार्षिक पारितोषिक वितरण

सोनगीर - आज दि.३१ जानेवारी रोजी वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ होणार आहे.

प्रसंगी उद्घाटक म्हणून कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगावचे व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. शिवाजी पाटील उपस्थित राहणार आहेत. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे संस्थापक

अमृतराव केशवराव कासार व संचालक उपस्थित राहणार आहेत.

कार्यक्रमाचे संयोजन महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. ए.बी. पाटील, उपप्राचार्य डॉ. आर. जी. खैरनार, अधीक्षक संदीप कासार, प्रा. अभय देवरे, डॉ. रवींद्र धिवरे, डॉ. नरेंद्र सोनवणे, डॉ. विवेकानंद पाटील तसेच महाविद्यालयीन विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी केले आहे.

## शहादा येथे मन्सुरी-पिंजारी सामाजिक संस्थेतर्फे द्वितीय सामूहिक विवाह सोहळा

शहादा - येथील मन्सुरी-पिंजारी सामाजिक संस्थेतर्फे व्दितीय सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सामुदायिक विवाह सोहळ्यात सात जोडप्यांचे समाजाच्या रितीरिवाजा नुसार विवाह लावण्यात आले.

शहरात झालेल्या मंसुरी पिंजारी समाजाच्या सामूहिक विवाह सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी समाजाचे प्रदेश अध्यक्ष आरिफ अली मंसूरी (मुंबई) होते तर मुख्य अतिथी म्हणून हाजी कलीम हाजी हसन मन्सुरी, सुलतान हाजी



मन्सुरी, किस्मत हाजी मन्सुरी, युनूस हाजी मन्सुरी, कलीम रमजान मन्युर्ग पिंजार्ग सामाजिक संस्था मंसूरी, हाजी नबी भिकन पिंजारी तर प्रमुख पाहुणे हाजी युनूस बागवान, हाजी अल्ताफ मेमन, हाजी नईम मन्सुरी शहादा पालिकेचे मुख्याधिकारी साजिद मुनाफ पिंजारी, आरिफ पिंजारी आदीसह समाज बांधव उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात समाजाच्या चालीरीती तसेच समाज एकसंघ रहावा. अडचणीच्या काळात एकमेकांना मदत करावी. सामुदायिक विवाह सोहळ्यामुळे खर्च वाचतो. शिवाय समाज बांधवांच्या गाठीभेटी होतात. यासाठी सामूहिक विवाह सोहळ्याला प्राधान्य द्यावे. असा सूर मान्यवरांनी व्यक्त केला.

या कार्यक्रमासाठी जळगाव, नाशिक, धुळे व नंदुरबार, जिल्ह्यासह, गुजरात राज्यातून देखील समाज बांधवांनी मोठ्या संख्येने आपली उपस्थिती दर्शवली होती.

यावेळी यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष शमसुद्दीन पिंजारी, उपाध्यक्ष साजिद पिंजारी आदींसह समाज बांधवांनी सहकार्य केले.

## अक्कलकुवा येथे शिवसेना उबाठातर्फे बस भाडेवाढीचा निषेध

अक्कलकुवा -राज्य शासनाने राज्य परिवहन महामंडळाच्या बस प्रवासात भाडेवाढ केल्याच्या निषेधार्थ शिवसेना उबाठा पक्षाच्यावतीने अक्कलकुवा येथील बस स्थानकात बसेस रोखून आंदोलन करण्यात आले.

राज्य शासनाने केलेली बस प्रवासाची भाडेवाढ मागे घ्यावी अन्यथा आंदोलन करण्यात येईल. या आशयाचे निवेदन आगार व्यवस्थापक मोरे पोलीस निरीक्षक गुलाबराव पाटील यांना दिले. यावेळी जिल्हा उपप्रमुख कृष्णचंद्रसिंह राणा, तालुकाप्रमुख रमेश वसावे,



तालुका संघटक प्रमोद बागले, शहर प्रमुख नंदलाल चौधरी, पवनसिंह राणा, जितेंद्र लोहार सह शिवसैनिक या आंदोलनात सहभागी झाले होते.

या आंदोलनावेळी देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राज्य शासनाने राज्य परिवहन महामंडळाच्या बस प्रवासाची केलेली भाडेवाढ मागे घ्यावी कुठल्याही प्रकारची इंधन वाढ नसताना केलेली ही भाडेवाढ सर्वसामान्य नागरिकांसह बस प्रवाशांसाठी आर्थिक पिळवणूक करणारी आहे. ही भाडेवाढ रद्द न केल्यास आंदोलन करण्यात येऊन चक्काजाम आंदोलन करण्याच्या इशारा देण्यात आला. काही वेळ बस स्थानकात येणाऱ्या व जाणाऱ्या बसेस रोखून धरण्यात आल्या होत्या. काही वेळानंतर बस सेवा सुरळीत झाली.

## तळवे येथे घरफोडीतील संशयित पोलिसांच्या ताब्यात

नंदुरबार-तळोदा तालुक्यातील तवे येथे एकाच रात्री तीन घरफोड्या करणाऱ्या संशयीतांचा शोध घेण्यात आला आहे.

तळवे येथे दि.२ ते ३ जानेवारीच्या रात्री जगबदिश कोळी, जितेद्र पगारे, सखाराम वळवी व कृष्णा ठाकरे यांचे घर फोडत चोरट्यांनी सुमारे ४४ हजार ५०० रूपये किंमतीचे सोने चांदी मुद्देमाल व रोख रक्कम चोरून नेली होती.

याप्रकरणी स्थानि गुन्हा शाखा व तळोद पोलीसांनी पाच संशयीतांना ताब्यात घेतले आहे. यात सबत प्यारसिंग अनारे, मानसिंग सदनसिंग चव्हाण, फुलसिंग हरसिंग मंडलोई, राज ललित सोनी, हर्दिककुमार जयवंतभाई सोनी सर्व रा. मध्यप्रदेश यांचा समावेश आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधिक्षक श्रवण एस.दत्त, अप्पर पोलीस अधिक्षक आशित कांबळे, उपविभागीय अधिकारी संजय महाजन यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या पथकाने केली आहे.

## तळोदा पालिकेची अनधिकृत बॅनरवर कारवाई ; गुन्हा दाखल

तळोदा -प्रशासकराज नंतर तळोदा शहराची बिकट अवस्था झाली आहे. असे दर्शवणारे बॅनर शहराच्या मध्यभागी स्मारक चौकात लावण्यात आले आहे. परंतु बॅनर लावण्याचा हा प्रकार अंगलट आला आहे. पालिका प्रशासनाने अशा बेकायदेशीरपणे बॅनर लावणाऱ्या विरोधात गुन्ह्याची नोंद केली आहे. यामुळे शहरात नागरिकांमध्ये आधी बॅनर व नंतर या बॅनर लावणाऱ्या विरोधात गुन्हाची दाखल झाला. याची जोरदार चर्चा सुरू आहे.

अगदी दोन दिवसांपूर्वी शहरात पालिकेच्या प्रशासक नंतर तळोदा शहराची अवस्था अश्या मथळ्याचे बॅनर लावण्यात आले होते. परंतु हे बॅनर पालिकेने अनधिकृत ठरवत बॅनर लावणाऱ्या विरुद्ध कारवाईचे हत्यार उपसले आहे.

पालिकेची पूर्व परवानगी न घेता व पालिकेची विहित फी जमा न करता लावण्यात आल्याचे कारण पुढे करत पालिकेने शहरात तथाकथित बॅनरची जोरदार चर्चा ज्ञात इसमा विरुद्ध तळोदा पोलीस स्टेशन मध्ये मालमत्ता विद्रुपीकरण। प्रतिबंधक अधिनियम १९९५ चे कलम ३ अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

## मालपूर गावाची कचरा गाडीची बत्ती गुल! गाडी पुन्हा सुरू करण्याची ग्रामस्थांची मागणी

**प्रभाकर आडगाळे**

मालपूर ता.शिंदखेडा (प्रतिनिधी)- शिंदखेडा तालुक्यातील मालपूर हे गाव सर्वात मोठे गाव आहे.येथे ग्रामपंचायत मध्ये प्रशासक राज आल्यापासून नागरीकांच्या समस्या या वाढतच चालल्या आहेत.

गावातील कचरा वाहतूक करणाऱ्या गाडीची बत्ती गुल झाल्याने नागरिकांना समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. एकूण १७ वार्डात घाणीचे साम्राज्य तयार झाले आहे. कचरा वाहतुक करणारी गाडीच येत नसल्यामुळे प्रत्येक वार्डात




कचराचा ढीग साचलेला दिसून येतो. त्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्य विषयी प्रश्नचिन्ह निर्माण झाला आहे या कचऱ्याच्या ढिगार्यामुळे विविध रोग पसरण्याची भीती निर्माण झाली आहे.याबाबत संबंधित प्रतिनिधीने एका ग्रामपंचायत सेवकाला विचारले असता, तो म्हणाला कि ग्रामपंचायतीची वसुली नसल्यामुळे कर्मचाऱ्यांचा पगाराचा अभाव आहे. तर दुसरी गोष्ट म्हणजे कचरा डेपो नसल्यामुळे सध्या कचरा गाडी बंद आहे असे त्यांनी सांगितले.त्यामुळे जर नागरिकांना सुविधांचा अभाव असेल तर कर मागण्याचा अधिकार पंचायतीला नाही किंवा प्रशासकाला नाही. अशी वाऱ्यावर असलेली ग्रामपंचायत काय ? कामाची अशी चर्चा होत आहे.पांढरे पोशाखधारी पुढारी देखील दिशाहीन निदर्शनास येतात.जवळच दोन कि.मी.वर असलेले सुराय गावात घरोघरी फिल्टर पाणी मिळते.यावरून तेथील ग्रामपचायतचे दर्जेदार काम दिसून येते.मालपूर व सुराय ग्रामपंचायत भाजपाच्या ताब्यात असून मालपुर गावात हा खुंटलेला विकास का? असा प्रश्न नागरिकांना पडलेला आहे.

## दुर्गम भागातील गांजा शेती केली उध्दवस्त, ७६ लाखांची झाडे जप्त, दोन जणांना अटक

धुळे -शिरपूर तालुक्यातील दुर्गम भागातील बोरमळीपाडा गावाजवळील भोईटी शिवारातील गांजावर शेती शिरपूर तालुका पोलिसांनी कारवाई करीत उद्धस्त केली. या कारवाईत एकुण ७६ लाखांची गांजाची झाडे जप्त करण्यात आली. तसेच गाजांची लागवड करीत पिकांची राखण करणाऱ्या दोघांना ताब्यात घेतले. याप्रकरणी तीन जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

वनजमिनीवर गांजा या अंमली पदार्थयुक्त वनस्पतीची लागवड केली जाते. त्याविरोधात गोपनिय माहिती काढुन अशा पिकांची लागवड करणाऱ्या व त्याला प्रोत्साहन देणाऱ्यांविरुध्द कारवाई करण्याचे आदेश पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी दिले होते. त्यानुसार माहिती काढत असतांना शिरपूर तालुका पोलिस ठाण्याचे निरीक्षक जयपाल हिरे यांना काल दि. २८ रोजी गोपनिय माहिती मिळाली की, बोरमळीपाडा गावाजवळ भोईटी शिवारात वनजमिनीवर संतोष ग्यानसिंग पावरा (रा. बोरमळीपाडा (भोईटी) पो. रोहीणी ता. शिरपूर) व रामप्रसाद हरजी पावरा (रा. भोईटी ता. शिरपूर) यांनी गांजाची लागवड केली आहे. त्यावरुन निरीक्षक हिरे यांनी पोलीस अधीक्षकांच्या परवानगीने कायदेशीर प्रक्रिया राबवुन त्या शेतावर छापा टाकला. तेथे गांजा पिकाची लागवड करुन राखण करतांना वरील दोघे मिळून आले. तसेच

तेथून जवळच काही अंतरावर असलेल्या वनजमिनीवर भावसिंग काशिराम पावरा (रा. बोरमळीपाडा ता. शिरपूर) याने देखील गांजा पिकाची लागवड केल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार तेथे पथकाने पाहणी केली असता गांजाची शेती मिळुन आली. पोलिसांची चाहुल लागताच भावसिंग पावरा हा पळुन गेला. ही शेती देखील रामप्रसाद पावरा व संतोष पावरा यांनी संगनमताने केली असल्याचे चौकशीत समोर आले. या दोन्ही कारवाईत ७६ लाख रुपये किंमतीची ३ हजार ८०० किलो गांजाची हिरवी झाडे असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

याप्रकरणी पोहेकों सागर ठाकुर यांच्या फिर्यादीवरुन शिरपूर तालुका पोलीस ठाण्यात वरील तिघांवर एनडीपीएस ॲक्टचे कायदा कलम ८ (क), २० (ब) आयआय (क) व २२ (क) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोसई सुनिल वसावे हे करीत आहेत. दोघांना आरोपीतांना न्यायालयात हजर केले असता एक दिवसाची पोलीस कोठडी देण्यात आली. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनिल गोसावी यांच्या मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जयपाल हिरे, पोसई सुनिल बसावे, पोकों सागर ठाकुर, पोहेकॉ खसावद, पोकों राजु ढिसले, पोहेकॉ संदिप ठाकरे, पोकॉ प्रकाश भिल, धनराज गोपाळ, मुकेश पावरा, कृष्णा पावरा, अल्ताफ मिर्झा, इसरार फारुकी, मनोज पाटील यांच्या पथकाने केली.


हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी** ✱ **संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (✱ पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक / सहमत असतीलच असे नाही. **Email- dainikshauryamarathi@gmail.com** (RNI-MAHMAR/2023/89125)

## जातिवाचक वस्त्या व रस्त्यांची नावे बदलणार राष्ट्रपुरुषांची नावे देणार, सूचना व हरकती मागविल्या



### कोणत्या भागात किती नावे

**नवी पेठ, जुने जळगाव, बळीराम पेठ, शनी पेठ, चौघुले प्लॉट व परिसरातील प्रभाग ४ व ५ मध्ये २१ वस्त्या व रस्ते आहेत. प्रभाग ९ पिंप्राळा गावठाण भागात ६, प्रभाग १० पिंप्राळा परिसरात ५, हरिविठ्ठल नगर परिसरात ५, प्रभाग १४ मधील तांबापुरा परिसरात ५, पंचशील नगरात ३, प्रभाग १६ मधील सिंधी कॉलनीत ४, प्रभाग १ व २ मधील शिवाजी नगरात ३, प्रभाग १७ मध्ये १, प्रभाग तीन मधील जुने जळगाव, खेडी भागात ३, प्रभाग १८ मधील मास्टर कॉलनी भागात १ व प्रभाग १२ मधील सुप्रीम कॉलनी भागात ३ असे एकूण १३ प्रभागात ५९ नावे आहेत. या सर्व ठिकाणी कोणत्या राष्ट्रपुरुषाचे नाव असावे हे महापालिकेने निश्चित केले आहे.**

जळगाव : शहरातील जातीवाचक वस्त्या व रस्त्यांची नावे बदलवून त्याजागी थोर राष्ट्रपुरुषांची नावे देण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. प्रशासनाने महानगरपालिका क्षेत्रातील जातीवाचक वस्त्यांचे व रस्त्यांचे सर्वेक्षण केले. त्यानुसार मनपा क्षेत्रात जातिवाचक नावे असलेल्या एकूण ५९ वस्त्या, गल्ली व रस्त्यांची नावे असल्याचे आढळून आले.

आता ती नावे बदलून त्या वस्त्यांना व रस्त्यांना महापुरुषांची व लोकशाही मूल्यांशी निगडित नावे देण्याचा निर्णय झालेला आहे.

नवीन नावाच्या संदर्भात प्रशासकीय महासभेत ठराव करण्यात आला असून त्यात नवीन नावेही सुचविलेली आहेत.

या ठरावाच्या अनुषंगाने नागरिकांच्या हरकती व सूचना मागविण्यात आलेल्या आहेत. त्यासाठी अधिसूचना बुधवारी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## आत्मनिर्भरद्वारे युवतींना अधिकारांची जाणीव

### आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळेत तज्ज्ञांचा सूर; विद्यार्थिनींनी घेतली अभियानाची माहिती

जळगाव-आत्मनिर्भर युवती अभियाना सारख्या विविध उपक्रमातून महाविद्यालयातील युवतींना आपले अधिकार व जबाबदाऱ्या समजतील असा सूर शैक्षणिक क्षेत्रातील तज्ज्ञांनी व्यक्त केला.

केसीई सोसायटीचे शिक्षणशाख आणि शारीरिक शिक्षणशास्त्र महाविद्यालय येथे आत्मनिर्भर युवती अभियान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या अभियानाअंतर्गत महाविद्यालयातील युवतींना योगासन, प्राणायामाचे प्रशिक्षण देण्यात आले व विविध विषयांवर तज्ज्ञ वक्त्यांनी मार्गदर्शन केले. त्यात प्रा. डॉ. विजेता सिंग यांनी 'महिलाविषयक कायदे' यावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. रेखा पाहुजा यांनी 'महिला सबलीकरण कायदे व शासन योजना यावर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. कविता पवार यांनी सॉफ्ट स्किल या



विषयावर मार्गदर्शन केले. प्रा. प्रविण कोल्हे यांनी फिजिकल फिटनेस वर मार्गदर्शन केले. प्रा. डॉ. अंजली बोंदर यांनी भारतीय महिला सबलीकरण कायदे विषयक इतिहास व सद्यस्थिती यावर यांची होती उपस्थिती या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक राणे यांनी 'महिला सबलीकरण कायदे व योजना कश्या प्रकारे महिलांच्या विकासात योगदान देतात हे सांगितले. विचार मंचावर महाविद्यालयाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी डॉ. केतन चौधरी व आत्मनिर्भर युवती अभियानाच्या समन्वयिका डॉ. पूनम जमधडे ह्या उपस्थित होत्या. समारोप समारंभ प्रसंगी सुत्रसंचालन अपूर्वा पाटील ह्या विद्यार्थीनी केले तर आभार प्रदर्शन विद्यार्थीनी पारली पावरा यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

मार्गदर्शन केले. व्याख्यान मालेत तज्ज्ञांनी महिला सबलीकरण कायदे आणि सद्यस्थिती मधील महिलांची स्थिती यांचा विचार केला तर प्रत्येक क्षेत्रात महिला आता आपला विकास करत आहे असे मत मांडले. संविधानाच्या माध्यमातून महिलांना समानतेचा अधिकार मिळाल्यामुळे महिला आज प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत असल्याचे सांगितले.

## नवविवाहितेचा सासूसमोरच दुदैवी मृत्यू, नातेवाईकांचा आक्रोश

जळगाव -डिसेंबर महिन्यात २ महिन्यांपूर्वी लग्न झाल्यानंतर पहिल्यांदाच अकोला येथून मुंबई येथे संसाराचा सामान घेऊन अमरावती-मुंबई रेल्वेतून प्रवास करत असताना अचानक नवविवाहितेची तब्येत बिघडली आणि त्यांचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. या घटनेमुळे तिच्या परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या संदर्भात भुसावळ रेल्वे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.



प्रियंका अक्षय सुरोशे (वय-२०, रा. ज्ञानेश्वर नगर, अकोला) असे मयत विवाहितेचे नाव आहे. टीसीने भुसावळ येथे उपचार मिळतील असे सांगितले. मात्र, प्रियंका यांची प्रकृती गंभीर होत गेली. रेल्वे भुसावळ स्थानकात पोहोचताच त्यांना तातडीने उपचारासाठी हलवण्यात आले. मात्र, रात्री १२ वाजता त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. प्रियंका यांचा मृतदेह जळगावच्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात हलवण्यात आला. मृत्यूची बातमी कळताच प्रियंकाचे माहेर असलेल्या बिलवाडी ता. जळगाव येथील माहेरच्या मंडळींनी रुग्णालयात धाव घेतली आणि एकच हंबरडा फोडला. या घटनेची भुसावळ रेल्वे पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू म्हणून नोंद करण्यात आली आहे. पुढील तपास रेल्वे पोलीस कर्मचारी नंदू खरडे करीत आहेत.

## खेळ भावनेतून प्रवाशांना सौजन्याने वागणूक द्या !

### परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष कुसेकर यांचे आवाहन

जळगाव -खेळ भावनेने खेळ खेळावा, खेळ भावना घेऊन विभागात जावे व कामकाजात नियोजन करावे. प्रवाशांना सेवा देतांना सौजन्याची वागणुक देण्यात यावी, असे आवाहन राज्य परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष माधव कुसेकर यांनी केले.

एस.टी. ५९ व्या राज्यस्तरीय क्रिडा स्पर्धेच्या शुभारंभ प्रसंगी ते बोलत होते. राज्य मार्ग परिवहन महामंडळ, जळगांव विभाग आयोजित ५९ व्या राज्यस्तरीय वार्षिक क्रिडा स्पर्धेचे कवयित्री बहीणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ, बांभोरी, येथील क्रिडांगणावर आयोजित करण्यात आल्या आहेत. कुलगुरू डॉ.




व्ही. एल. माहेश्वरी यांचे हस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एसटी महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. माधव कुसेकर होते. त्यांनी क्रीडा ध्वजारोहण केले. मान्यवरांनी ज्योत पेटवली. अमृता ताम्हणकर यांनी स्वागत केले. कुलगुरू डॉ. माहेश्वरी, शिव छत्रपती राज्य क्रिडा पुरस्कार ५९ व्या वार्षिक क्रीडा स्पर्धा २०२४-२५ जळगांव विजेते डॉ. प्रदीप तळवेलकर, अमृता ताम्हणकर, राजेश कोनवडेकर, अशोक पन्हाळकर यांचे स्वागत विभाग नियंत्रक भगवान जगनोर यांनी केले. शेठ ला. ना. शाळेच्या एनसीसी पथकने सलामी दिली. एकलव्य क्रीडा संकुलाच्या खेळाडूंनी मल्लखांबांचे प्रात्यक्षिक केले. शिवफुले मर्दानी आखाडा, रावेरच्या महिला पथकाने शिवकालिन लाठी, दांडपट्टा, तलवारबाजीचे प्रात्यक्षिक खेळ केले.

**३५ विभागातील ७१५ खेळाडू**

सदर क्रिडा स्पर्धेसाठी ३५ विभागामधुन एकुण ७१५ खेळाडु आलेले असुन त्यात महिला खेळाडु ८५ व पुरुष खेळाडु ६३० आहेत. खेळाडूंची निवास व्यवस्था जिल्हा क्रिडा संकुल, साई बाबा मंगल कार्यालय, पाळधी येथे पुरुष खेळाडूंची व्यवस्था केलेली आहे.

## जळगावात मानवी शरिराचे अवशेष आढळल्याने खळबळ ; फॉरेन्सिक तपासणी केली जाणार

जळगाव - जळगाव तालुक्यातील धानवड-पिंपळे शेत शिवारात मानवी शरिराचे अवशेष आढळून आहे. या प्रकारामुळे एकच खळबळ उडाली असून हे अवशेष शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालयात आणण्यात आले आहे. याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

तालुक्यातील धानवड-पिंपळे शिवारातील शेतात जात असलेल्या तरुणाला शेतात मानवी शरिराचे काही अवशेष दिसून आले. त्यांनी याबाबतची माहिती पोलीस पाटील यांना दिली. त्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेत पाहणी केली असता, त्याठिकाणी मानवी शरितातील कवटी आणि हातापायासह इतर अवशेष दिसून आले. त्यांनी लागलीच याबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांना कळविले.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत पोलीस निरीक्षक संदीप पाटील यांनी अधिकाऱ्यांसह घटनास्थळी भेट दिली. त्यांनी प्राथमिक तपास करून मानवी अवशेष जप्त केले आणि ते जिल्हा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात पुढील तपासणीसाठी पाठविण्यात आले. या घटनेबाबत एमआयडीसी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. या घटनेत मृतदेह किती दिवसांपूर्वीचा आहे, तो पुरुषाचा आहे की स्त्रीचा, मृत्यूचे कारण काय आहे, हे स्पष्ट होण्यासाठी पुढील फॉरेन्सिक तपासणी केली जाणार आहे.

## शहरात दुचाकीस्वार जखमी प्रकरणी बसचालकावर गुन्हा दाखल

जळगाव-जळगाव शहरातील स्वातंत्र्य चौकात भरधाव बसने दुचाकीला मागुन जोरदार धडक दिल्याने दुचाकीस्वार तरूण गंभीर जखमी झाल्याची घटना १२ जानेवारी रोजी दुपारी अडीच वाजता घडली होती.

याप्रकरणी मंगळवारी २८ जानेवारी रोजी रात्री १० वाजता जिल्हापेठ पोलीस ठाण्यात बसवरील चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

यासंदर्भात अधिक माहिती अशी की, अभिमन्यू लक्ष्मण शिनकर (वय ३८, रा. अरिहंत कॉलनी) हे आपल्या परिवारासह वास्तव्याला आहेत. ते सेवानिवृत्त भारतीय सैनिक आहेत. १२ जानेवारी रोजी त्यांच्याजवळील (यूके ०७, डीएफ ५४५१) क्रमांकाच्या दुचाकीने स्वातंत्र्य चौकातून जात होते. यावेळी मागून भरधाव वेगाने जाणाऱ्या (एमएच १४, बीटी १९७९) क्रमांकाच्या बसने त्यांना मागून जोरदार धडक दिली.

यामध्ये अभिमन्यू शिनकर हे गंभीर जखमी झाले. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार झाल्यानंतर चंद्रकांत शिनकर यांनी जिल्हापेठ पोलिसात तक्रार दिली.

त्यानुसार मंगळवारी २८ जानेवारी रोजी रात्री १० वाजता जिल्हापेठ पोलीस ठाण्यात बस चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. तपास पोलीस नाईक कमलेश पवार करीत आहे

## जिल्हा पुरवठा विभागाच्यावतीने गुणसंवर्धित तांदुळा बद्दल मार्गदर्शन कार्यशाळा

जळगाव(प्रतिनिधी)- जिल्हा पुरवठा अधिकारी कार्यालय जळगावच्या वतीने नियोजन भवन येथे दि.३० रोजी गुणसंवर्धित तांदूळ (फोर्टी फाईड राईस) याबद्दल मार्गदर्शन कार्यशाळा पार पडली. सदर कार्यशाळेमध्ये UNWFP च्या भारताच्या सीनियर प्रोग्राम असोसिएट श्रीमती नंदिता जोशी यांनी जळगाव जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील पुरवठा विभागातील अधिकारी कर्मचारी




गोदाम व्यवस्थापक व रास्त भाव दुकानदार यांना गुणसंवर्धित तांदूळ याची पार्श्वभूमी, आवश्यकता, बनवण्याची प्रक्रिया, वापरण्याची प्रक्रिया याबाबत सखोल मार्गदर्शन केले. शरीरातील लोह, फॉलिक ॲसिड, विटामिन बी१२ याची कमतरता दूर करण्यासाठी सदर तांदूळ रास्त भाव दुकानातून वितरित करण्यासाठी शासनाने सुरुवात केलेली आहे. सदर तांदूळ हा प्लास्टिक नसून पौष्टिक असल्याने सामान्य नागरिकांनी याबाबत कोणताही गैरसमज ठेवू नये व त्याचे होणारे फायदे जाणून घेऊन त्याचा आपल्या आहारात समावेश करावा असे आवाहन त्यांनी केले.

सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सहाय्यक जिल्हा पुरवठा अधिकारी रुपेश बिजेवार हे होते.

क्षेत्रीय स्तरावर गुणसंवर्धित तांदूळ बाबत जनजागृती करण्याचा सूचना त्यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना यावेळी दिल्या.

## शिरसोली येथे गोमांस विक्रीवरुन तणाव, गोमांस विक्री करणाऱ्या भामट्यास पोलीसांनी घेतले ताब्यात

जळगाव -शिरसोली येथे गोमांस विकत असल्याच्या संशयावरून एका इसमास आठवडे बाजार येथे जमावाकडुन जबर मारहाण करण्यात आली. वेळीच औद्योगिक पोलीसांनी हस्तक्षेप करीत सदर इसमास ताब्यात घेतल्याने पुढील अनर्थ टळला. यावेळी मोठी गर्दी जमा झाली होती.

शिरसोली प्रन येथील एका ठिकाणी गोमांस कापले जात असुन तेथे त्याची विक्री होत असल्याचे गावातील काही तरुणांना कळले.

त्यावरुन सर्व तरुण एकत्र येत गोमांस विक्री करीत असलेल्या इसमास त्या ठिकाणाहून मुद्देमालासह पकडुन



### पोलिसांची घटनास्थळी धाव

घटनेची माहिती मिळताच औद्योगिक पोलीस स्टेशनचे एपीआय अनिल वाघ, पीएसआय राहुल तायडे, हेड कॉन्स्टेबल समाधान टाहकळे, शुध्दधन ढवळे, अधिकार पाटील, योगेश बारी, कीरण पाटील, यांच्यासह मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करत संशयीत इसमाची गर्दीतुन सुटका करण्यात आली. तसेच त्यास चौकशीसाठी ताब्यात घेऊन पोलीस स्टेशनला रवाना करण्यात आले. या वेळी काही अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

शिरसोली प्र बो येथील बाजारपेठ भागात आणले.

गोमांस विक्री करणाऱ्याला पकडले असल्याची वार्ता गांवात पसरताच बाजार पेठेत एकच गर्दी जमा झाली.

गर्दीतील काही तरुणांनी गोमांस विक्री करणाऱ्या इसमास चांगलाच चोप दिला. यावेळी रामभाऊ भिल, अर्जुन पवार, अनिल न्हावी, प्रविण पाटील, प्रदीप पाटील यांनी जमावाला शांत करण्याचा प्रयत्न करुन औद्योगिक पोलीसांना माहीती कळवुन पाचारण करण्यात आले.

## मविप्र प्रकरणातील संशयितांविरुद्ध वाढवले संघटीत गुन्हेगारीचे कलम

जळगाव : जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादीत संस्थेच्या कार्यालयात घुसून मारहाण करुन कागदपत्रे चोरी प्रकरणी ॲड. विजय पाटील, ॲड. प्रवीण चव्हाण याच्यासह चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल आहे. त्यांच्याविरुद्ध संघटीत गुन्हेगारीचे वाढीव कलम लावण्यात आले आहे. याबाबतचे कागदपत्रे सरकार पक्षातर्फे मंगळवारी न्यायालयात सादर करण्यात आली.

जिल्हा मराठा विद्या प्रसारक सहकारी समाज मर्यादित या शैक्षणिक - संस्थेचे मानद सचिव नीलेश भोईटे यांनी दि. १५ डिसेंबर रोजी जिल्हा पेठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली.

त्यावरून ॲड. विजय भास्कर पाटील, त्यांचे भाऊ संजय भास्कर पाटील, ॲड. प्रवीण चव्हाण, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलसचिव विनोद पाटील यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी ॲड. विजय पाटील यांना जामीन मिळालेला आहे. तर उर्वरित तीन जणांनी अटकपूर्व जामीनसाठी वेगवेगळे अर्ज दाखल केले आहे. त्यावर बचावपक्ष व सरकारपक्षाचा युक्तीवाद झाला आहे. या प्रकरणाचे विशेष सरकारी वकील ॲड. सुशील अत्रे यांनी मंगळवारी न्यायालयात तपासाची कागदपत्रे सादर केली. त्यात बीएनएस कलम १११ नुसार संघटीत गुन्हेगारीचे वाढीव कलम लावण्यात आले आहे. अशी माहिती ॲड. अत्रे यांच्यासह जिल्हापेठ पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक राकेश मानगावकर यांनी दिली. या प्रकरणी गुन्हा दाखल असलेल्या वरील चारही जणांवर हे कलम लावण्यात आले आहे. पूर्वी भादंवि कलम १२० (ब) नुसार कटकारस्थानचे कलम होते, आता त्यात या नवीन कलम वाढविण्यात आले आहे.

# चोपडा शेतकी संघाच्या रेशन दुकान विरोधात नागरिकांचा पुन्हा संताप; अध्यक्ष मुंबईला गेल्याने 'त्या' कर्मचाऱ्यावरील फौजदारी कारवाई लांबली!






चोपडा(प्रतिनिधी)- सर्वसामान्य जनतेपर्यंत शासकीय योजना पोहचायला हव्यात असे शासनाचे व्यापक धोरण असतांना,चोपडा शेतकी सहकारी संघास चालविण्यासाठी दिलेल्या रेशन दुकान चालकाने मात्र शेकडो लाभार्थ्यांना रेशन मालाच्या लाभापासून वंचित ठेवल्याचा प्रकार दि.२६ जानेवारी रोजी शेतकी संघाचे अध्यक्ष ललित बागुल यांच्या निदर्शनास नागरिकांनी आणून दिला होता.यात शेतकी संघाचे अध्यक्ष ललित बागुल यांनी कार्य तत्परता दाखवीत त्वरित रेशनमालाचे वितरण सुरू केले होते. त्यासोबतच रेशन दुकान चालक तथा शेतकी संघाच्या कर्मचारी भिका याच्यावर फौजदारी स्वरूपाच्या गुन्हा दाखल करून त्याच्याकडून विल्हेवाट लावलेल्या रेशनमालाची रिकवरी करण्यात येईल असेही प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले होते.अध्यक्षांच्या या कडक कारवाईच्या आश्वासनाने रेशनमालाचे वितरण सूरळीत सुरू होते मात्र आज सहाव्या दिवशी पुन्हा रेशन लाभार्थ्यांच्या संताप अनावर झाल्याने वाद निर्माण झाला.वरिष्ठ अधिकारी याबाबत जाणिवपुर्वक दुर्लक्ष करीत असल्याचे संतप्त प्रतिक्रिया यावेळी उमटल्या.

शेतकी संघ चालवित असलेल्या रेशन दुकानात रेशन माल घेण्यासाठी लाभार्थी पहाटे तीन ते चार वाजे पासून नंबर लावत असतात आणि रेशन वाटप करणारे मात्र सकाळी आठ ते नऊ वाजता येत असतात.१० ते २० लोकांना रेशन वाटप झाले की थम्स घेणारे,मशीन खराब झाले किंवा माल संपला असे कारण पुढे करून रेशन दुकान बंद केली जाते. आपला रोजगार बुडवून आलेल्या सर्वसामान्य जनतेला सततचा होणाऱ्या या त्रासाचे रूपांतर पुन्हा संतापात झाले.मात्र पाच दिवस होऊन देखील वरीष्ठ अधिकारी सुस्त का आहेत? हा संशोधनाचा भाग आहे.सामान्य जनता तक्रार करण्यासाठी तहसील कार्यालयात गेले की, तिथे कोणीही अधिकारी भेटू देत नाही अशी प्रतिक्रिया यावेळी संतप्त नागरिकांच्या उमटत होत्या. एकाच ठिकाणी चार चार रेशन दुकाने का?आणि कोणाच्या आशीर्वादाने दिली गेली याचा देखील शोध घेतला गेला पाहिजे असे नागरिकांचे मत आहे.शेतकी संघाचे मॅनेजर व संचालक मंडळ या रेशन वाटपाचे मासिक बैठकीत आवक जावक चे रजिस्टर चेक करतात की नाही? रेशन माल लोकांना वितरित न करता सदर माल कोठे गेला? कोणाच्या घशात गेला? याकडे अधिकाऱ्याचे दुर्लक्ष का होत आहे? वाटप न केलेल्या मालाचे लाभार्थी कोण-कोण? याबाबत जिल्हाधिकाऱ्यांनी चौकशी करावी अशी मागणी होत आहे.तसेच संबंधित कर्मचाऱ्यांकडून मालाची वसुली व्हावी व लवकरात लवकर फौजदारी गुन्हा दाखल करावा.तसेच पाठराखण करणारा संबंधित अधिकाऱ्याची देखील चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

मी माझ्या खाजगी कामानिमित्त मुंबईला असल्याने रेशन वितरित करणाऱ्या 'त्या' संबंधित कर्मचाऱ्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्यास विलंब झाला असून दोन दिवसात मुंबईहून चोपडा येथे परत आल्यावर त्या कर्मचाऱ्यावर फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यासाठी कायदेशीर पावले उचलली जातील. तसेच यात जे कोणीही दोषी असतील त्यांच्यावर देखील कडक कारवाई करण्यात येईल.

**ललित बागुल**
**अध्यक्ष,शेतकी संघ,चोपडा**

### लाभार्थ्यांना दिल्या जातात पिवळ्या व गुलाबी रंगाच्या 'वेटींग' पावत्या

रेशन मालाची उचल दर महिन्याला गोडाऊन मधून नियमित घेतल्यानंतरही रेशन लाभार्थ्यांना या मालाचे वितरण गेल्या चार महिन्यापासून झालेले नाही या बदल्यात रेशन ग्राहकांचे थम्स घेऊन त्यांना माल वितरित न करता पिवळ्या व गुलाबी रंगाच्या वेटिंगच्या पावत्या देण्यात आल्या आहेत. तसेच दीपावली काळातील कीटही देण्यात आले नसून त्याची देखील फिक्कट पिवळ्या रंगाची वेटिंगची पावती दिलेली आहे.हा सारा प्रकार रेशन लाभार्थी ग्राहकांनी प्रसार माध्यमांसमोर पावत्या दाखवीत निदर्शनास आणून दिला.दर महिन्याला गोडाऊन मधून उचल केलेला रेशन माल लाभार्थ्यांना वाटप का केला जात नाही? यामागे मोठे गौडबंगाल असल्याचे या निमित्ताने दिसून येते.

# दुचाकीच्या चाकात साडी अडकली अन महिलेचा दुर्दैवी मृत्यू



जामनेर - सिल्लोड येथे प्लॉटच्या कामासाठी दुचाकीवरून जाताना दुचाकीच्या चाकात साडी अडकल्याने झालेल्या अपघातात पहुर येथील ४८ वर्षीय महिलेचा मृत्यू झाल्याची घटना दि.३० रोजी घडली.

मिळालेल्या माहितीनुसार, मनीषा कैलास चौधरी या त्यांचा मुलगा ऋषी चौधरी याच्यासोबत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सिल्लोड येथे प्लॉटच्या कामासाठी जात होत्या. छत्रपती संभाजीनगर राष्ट्रीय महामार्गावरील सिल्लोड शहराजवळ दुचाकीच्या मागील चाकात मनीषा चौधरी यांच्या साडीचा पदर अडकल्याने त्याखाली कोसळल्या. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर इजा झाल्याने त्यांना तत्काळ सिल्लोड येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी अंति त्यांना मयत घोषित केले.

मनीषा चौधरी या पहूर येथील जळगाव मार्गावर राहत होत्या. मनमिळाऊ स्वभाव आणि सहकार्याची भावना असणाऱ्या मनीषा चौधरी यांच्या अचानक झालेल्या मृत्यूमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. मयत मनीषा चौधरी यांच्या पश्चात पती, २ मुले, सुन, नातू असा परिवार आहे. त्यांच्या दुर्दैवी निधनामुळे पहुर परिसरावर शोककळा पसरली आहे.

# गोवा-जळगाव-पुणे फ्लाइट अचानक रद्द



जळगाव : विमानतळावरून गोवा जळगाव-पुणे ही विमानसेवा गुरुवारी अचानक रद्द झाल्याने प्रवाशांची तारांबळ उडाली. विमान कंपनीकडून तांत्रिक कारणास्तव ही विमान सेवा रद्द झाल्याचे सांगण्यात आले.

जळगाव विमानतळावरून गोवा-जळगाव-पुणे अशी विमानसेवा गेल्या सात ते आठ महिन्यांपासून सुरू आहे. अनेक वेळा विमानसेवा अचानक रद्द होत असल्याने प्रवाशांची तारांबळ उडत आहे. गुरुवारीदेखील गोव्याहून दुपारी जळगावला येणारे विमान गोव्याहून जळगावला येऊन पुण्याला जाणारे व पुण्याहून जळगावला येऊन गोव्याला जाणारी फ्लाईट विमान कंपनीकडून रद्द झाली.

# चोपडा महाविद्यालयात रंगले खान्देशी कवी व संशोधक यांचे सुसंवाद सत्र




चोपडा (प्रतिनिधी)- येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालय,चोपडा मराठी अभ्यास मंडळ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव आणि मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवार दि.२९ जानेवारी, २०२५ रोजी प्रथम वर्ष कला मराठी या विषयाच्या द्वितीय सत्रावर आधारित 'विद्यापीठस्तरीय चर्चासत्राचे' आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे उदघाटन उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे प्रथम कुलगुरू प्रा.डॉ.एन.के.ठाकरे यांच्या हस्ते खान्देश कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून तसेच दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या चर्चासत्रात ६० हून अधिक संशोधक प्राध्यापक बंधू-भगिनी तसेच खान्देशातील १५ मान्यवर कवी उपस्थित होते.

सदर चर्चासत्र उदघाटन सत्र, कवी व संशोधक संवाद सत्र वआणि समारोप सत्र अशा तीन सत्रात पार पडले. चर्चासत्राच्या द्वितीय सत्राच्या अध्यक्षपदी सुप्रसिद्ध खान्देश कवी अशोक सोनवणे हे उपस्थित होते. यावेळी कवी वा. ना. आंधळे, कवी मिलिंद बागुल, कवयित्री लतिका चौधरी, कवयित्री विमल वाणी, कवी प्रभाकर शेळके, कवी प्रभाकर महाजन, कवी निंबा बडगुजर, कवी संतोष पावरा, कवी राजेंद्र रायसिंग, कवी संतोष साळवे या कवींनी आपल्या काव्यनिर्मिती मागील भूमिका, लेखन प्रेरणा स्पष्ट करून कवितांचे सादरीकरण केले तसेच उपस्थित संशोधकांशी सुसंवाद साधला.या सत्राचे सूत्रसंचालन डॉ. माणिक बागले यांनी केले तर आभार डॉ.एम.एल.भुसारे यांनी मानले.

या चर्चासत्राच्या समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. फुला बागुल हे उपस्थित होते. या कार्यक्रमाप्रसंगी उपप्राचार्य चर्चासत्र संयोजक व उपप्राचार्य प्रा.डॉ.के.एन.सोनवणे, उपप्राचार्य डॉ.ए.बी. सूर्यवंशी, समन्वयक डॉ.एस.ए.वाघ, प्रा.डॉ. फुला बागुल, अभ्यास मंडळ सदस्य डॉ. माणिक बागले, डॉ. संदीप माळी, डॉ. सचिन पाटील व डॉ. सुलतान पवार आदि मान्यवर उपस्थित होते.या कार्यक्रमाप्रसंगी डॉ.शरद बिऱ्हाडे व डॉ. जतीनकुमार मेढे यांनी प्रातिनिधिक स्वरूपात आपले मनोगत व्यक्त करतांना एकंदरीत चर्चासत्रातील उल्लेखनीय बाबींवर प्रकाश टाकून चर्चासत्राच्या आयोजन व नियोजनाचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय मनोगत व्यक्त करतांना प्रा. डॉ. फुला बागूल यांनी चर्चासत्रातील दिवसभरात झालेल्या विचार मंथनातून विद्यार्थ्यांना कवितेविषयी अध्यापन करतांना या चर्चासत्राचा निश्चित फायदा होईल अशी अपेक्षा व्यक्त केली.त्याबरोबर काव्यप्रयोजन, भूमिका, काव्याची सौंदर्य स्थळे यावर अभ्यासपूर्ण भाष्य केले.

या समारोप सत्राचे सूत्रसंचालन व आभार चर्चासत्र समन्वयक डॉ. एम.एल.भुसारे यांनी यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सौ. एम. टी.शिंदे, सौ. सुनीता पाटील, डॉ.आर.आर.पाटील, डॉ.एम.बी. पाटील, डॉ.सौ. संगीता पाटील, डॉ. ए.एच.साळुंखे, एन. बी. पाटील, सौ. पुष्पा दाभाडे, एम. बी. पावरा, डॉ.डी.डी. कर्दपवार, किशोर खंडाळे, चेतन बाविस्कर, सौ. शुभांगी पाटील, नितेश सोनवणे तसेच जीवन पाटील, अभिजीत बाविस्कर, नरेंद्र सोनवणे, उज्वल मराठे व अनिल पाटील यांनी सहकार्य केले.

या कार्यक्रमाप्रसंगी कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ परीक्षेत्रातील बहुसंख्य प्राध्यापक बंधू- भगिनी, संशोधक विद्यार्थी, शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# जैन इरिगेशनचा नऊ महिन्यांत ४०३०.६ कोटींचे एकूण उत्पन्न

## तिमाही व नऊ महिन्यांच्या आर्थिक निकालांत स्थिर कामगिरी आणि सुधारित EBITDA मार्जिन

जळगाव (प्रतिनिधी) - जैन इरिगेशन सिस्टम्स लिमिटेडने ३१ डिसेंबर २०२४ रोजी संपलेल्या तिमाही आणि नऊ महिन्यांच्या आर्थिक निकालांची घोषणा केली. कंपनीने नऊ महिन्यांत एकूण ४०३०.६ कोटींचे उत्पन्न आणि ४९३.२ कोटींचा EBITDAनोंदवला.

तिसऱ्या तिमाहीत, कंपनीने EBITDA मार्जिनमध्ये सुधारणांसह स्थिर कामगिरी प्रदर्शित केली. गेल्या नऊ महिन्यांत, कंपनीने भविष्यातील वाढीसाठी निधी उपलब्ध करण्यासाठी आणि कर्ज कमी करण्यासाठी आपल्या व्यवहारातून लक्षणीय रोख रक्कम निर्माण केली आहे.



कंपनीचे उपाध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक अनिल जैन यांनी सांगितले की, तिसऱ्या तिमाहीत आम्ही स्थिर कामगिरी केली आहे आणि आमचे EBITDA मार्जिन सुधारले आहे. गेल्या नऊ महिन्यांत, आम्ही आमच्या व्यवहारातून लक्षणीय रोख रक्कम निर्माण केली आहे, जी आम्हाला आमच्या कर्जाची पातळी कमी करण्यात आणि आमच्या भविष्यातील वाढीसाठी गुंतवणूक करण्यात मदत करेल.

पुढील काळात कंपनी कृषी उत्पादनात वाढ, सरकारी भांडवली खर्च वाढ आणि मजबूत सेवा क्षेत्रामुळे वापरात सुधारणा होण्याची अपेक्षा करते. किरकोळ विक्री, कॅशफ्लो आणि ऑपरेटिंग मार्जिन सुधारण्यावर लक्ष केंद्रित केले जाईल. जैन यांनी पुढे सांगितले की, पाईप, सौर ऊर्जा प्रणाली आणि आंतरराष्ट्रीय विक्री यासारख्या आमच्या प्रमुख व्यवसाय क्षेत्रांमध्ये पुढील काही तिमाहीत आम्ही मजबूत कामगिरी करू, जरी व्यापक आर्थिक वातावरण काही आव्हाने सादर करत असले तरी, आम्ही आमचे मार्जिन आणि कॅशफ्लो सुधारण्यावर लक्ष केंद्रित करून, सतत वाढीसाठी चांगल्या स्थितीत आहोत.

जैन इरिगेशन सिस्टम्स लिमिटेड ही मायक्रो इरिगेशन सिस्टम्स, पीव्हीसी आणि एचडीपीई पाईप्स, प्लॅस्टिक शीट्स, कृषी प्रक्रिया उत्पादने, अक्षय ऊर्जा सोल्यूशन्स, टिश्यू कल्चर प्लांट्स, वित्तीय सेवा आणि इतर कृषी इनपुट्सच्या उत्पादनात गुंतलेली एक प्रमुख भारतीय बहुराष्ट्रीय कंपनी आहे.

# कर्जबाजारीपणाला कंटाळून शेतकऱ्याची विषारी औषध घेऊन आत्महत्या



धरणगाव -तालुक्यातील चमगाव येथील ४५ वर्षीय व्यक्तीने शेतातील कर्जबाजारीपणाला कंटाळून सोमवारी २७ जानेवारी रोजी दुपारी शेतात विषारी औषध घेतले होते. त्यांना जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात उपचारासाठी दाखल केले असता गुरुवारी ३० जानेवारी रोजी पहाटे ५ वाजता उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. यासंदर्भात धरणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

राजेश्वर आनंदा सावंत (वय-४५, रा.चमगाव ता. धरणगाव) असे मयत शेतकऱ्याचे नाव आहे. त्यांच्या पश्चात आई, कमलाबाई पत्नी आशाबाई आणि सागर, विशाल ही दोन मुले असा परिवार आहे. चमगाव येथे शेती करून ते परिवाराचा उदरनिर्वाह करत होते. गेल्या काही वर्षापासून त्यांनी शेती करण्यासाठी कर्ज काढले होते. पण सततची नापिकी आणि कर्जबाजारीपणाला कंटाळून त्यांनी सोमवारी २७ जानेवारी रोजी दुपारी २ वाजता शेतात असताना विषारी औषध घेतले.

प्रकृती खालावल्याने त्यांना त्यांच्या नातेवाईकांनी तातडीने जळगाव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले. त्यांच्यावर उपचार सुरू असताना गुरुवारी ३० जानेवारी रोजी पहाटे ५ वाजता त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. या संदर्भात धरणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

# फोन करण्याच्या बहाना करून भामट्याने मोबाईल लांबविला:पातोंडा येथील घटना

अमळनेर ( प्रतिनिधी ) - तालुक्यातील पातोंडा येथे सरपंच मनीषा मोरे यांच्या पतींना एकाने मजुरांना बोलवायचे आहे त्यासाठी फोन लावून द्या असे सांगून फोनवर बोलण्याचे कारण करीत मोबाईल लांबवल्याची घटना पातोंडा येथील घडली आहे. याप्रकरणी अमळनेर पोलीस स्टेशनला घटनेची नोंद करण्यात आली आहे.

येथील न्यू प्लॉट भागांतील रहिवासी सरपंच मनिषा मोरे यांच्या घरी बुधवार रोजी दुपारी अडीच वाजेच्या सुमारास सरपंच यांचे पती विजय मोरे हे दुपारी घराबाहेर उभे असताना एक अज्ञात व्यक्ती त्यांच्याजवळ येऊन मला सेंट्रीग नेण्यासाठी गाडी लागणार असून तुमची गाडी भाड्याने मिळेल का? अशी विचारणा केली. त्यानंतर विजय मोरे व तो व्यक्ती गाडी घेवून निघाले. पुढे एका अरुंद गल्लीजवळ गाडी थांबवून त्या अज्ञात व्यक्तीने मला माझ्या मजुरांना फोन करून बोलवायचे सांगून मोरे यांच्याकडून मोबाईल मागितला आणि खाली उतरला.

मोरे हे गाडी रिव्हर्स करत असताना तो अज्ञात व्यक्ती मोबाईल घेऊन पसार झाला. सदर व्यक्ती मोबाईल घेऊन येत कसा नाही हे बघायला मोरे हे गेले तेव्हा त्यांना सदर व्यक्ती दिसून आला नाही. शेवटी त्यांना सदर व्यक्ती मोबाईल चोरून नेल्याचे लक्षात आले. सदर अज्ञात चोरटा सीसीटीव्ही फुटेज मध्ये कैद झाला असून मोरे यांनी अमळनेर पोलीस स्टेशनला त्या व्यक्ती विरुद्ध तक्रार दिली आहे. सदर अज्ञात चोरटयाने १५ दिवसांपूर्वी अशाच पद्धतीने एका गाडी मालकाचा मोबईल लाबविला असल्याचे सांगण्यात येत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

# भगिनी मंडळ कला व वाणिज्य महाविद्यालय, रासेयो विभाग व चोपडा शहर पोलिस स्टेशन यांनी राबविले रस्ता सुरक्षा अभियान



चोपडा (प्रतिनिधी)- केंद्र शासनाच्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय यांच्या वतीने १ ते ३१ जानेवारी दरम्यान राष्ट्रीय रस्ता सुरक्षा महिना पाळला जात आहे, या अभियानाची संकल्पना 'रस्ता सुरक्षा - जीवन रक्षा' ही आहे. याच पार्श्वभूमीवर चोपडा शहरात कबचौ उमवि, राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या मार्गदर्शनातून भगिनी मंडळ संचलित कला व वाणिज्य महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व चोपडा शहर पोलिस स्टेशन अंतर्गत वाहतूक शाखा यांच्यावतीने रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात आले.याची सुरुवात चोपडा शहर पोलिस स्टेशन येथे करण्यात आली.

याठिकाणी पोलिस उपनिरीक्षक अनिल भुसारे यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांची माहिती देऊन वाहतूक नियम व रस्ता सुरक्षा विषयी समाजात जनजागृती करण्याचे कार्य रासेयो स्वयंसेवक करत आहेत हे कार्य कौतूकास्पद आहे, असे सांगून अभियानासाठी शुभेच्छा दिल्या तर वाहतूक पोलीस महेंद्र पाटील यांनी सिग्नलचे नियम व वाहतूक नियम यांची प्रात्यक्षिकांसह माहिती दिली.

पोलिस निरीक्षक मधुकर साळवे, पोलिस उपनिरीक्षक अनिल भुसारे, प्राचार्य डॉ. ईश्वर सौंदानकर,डॉ.आशिष गुजराथी, डॉ.संजय चौधरी यांच्या मार्गदर्शनातून हे अभियान राबविण्यात आले.

रासेयोच्या १२ स्वयंसेवकांनी शहरात हेल्मेट बाबत जनजागृती केली. शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विद्यार्थ्यांनी हेल्मेट घालणाऱ्या वाहन चालकांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत केले. तसेच दुचाकी वाहन धारकांनी हेल्मेट वापरणे व चारचाकी वाहन धारकांनी सीट बेल्ट लावणे याबाबत जनजागृती करण्यात आली.

सीटबेल्ट न लावल्यामुळे व हेल्मेट न वापरल्यामुळे होणारे दुष्परिणाम याबाबत ही माहिती दिली. यावेळी वाहतूक पोलीस महेंद्र पाटील, संदीप पाटील, अक्षय सूर्यवंशी यांच्यासह रासेयो कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा.अनिल बाविस्कर, महिला कार्यक्रम अधिकारी सहा. प्रा.एकता अग्रवाल, सहा. प्रा.समाधान सोनवणे, सहा प्रा.तुषार बाविस्कर आदी उपस्थित होते.